ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३८ वे | दिनांक : १२/०५/२०२६ | वार : बुधवार

## मोदींच्या आवाहनाविरोधात राष्ट्रवादी आक्रमक; जितेंद्र आव्हाडांचा निशाणा



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वैयक्तिक वाहनांचा वापर बंद करून सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे आवाहन देशातील जनतेला केले आहे. तसेच वर्षभर सोने देखील खरेदी न करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. अनेक गोष्टींचे आवाहन मोदी यांनी केले. त्यानंतर विरोधकांनी त्यांच्या या आवाहनांचा जोरदार निषेध केला आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटातर्फे ठाण्यात आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे घोड्यावर सवार झाल्याचे पाहायला मिळाले.

प्रसारमाध्यमांशी बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, पूर्वी लोक घोड्यावरून फिरायचे, बैलगाडी घेऊन फिरायचे. आता पेट्रोल आले, डिझेल आले गाड्या आल्या. आता परत एकदा २००० वर्षांपूर्वी मागे घेऊन जाणार मोदी हे आपल्याला माहीत आहे. आता मंत्र्यांना पण आम्ही सांगणार की मंत्रालयात जाताना घोड्यावर जा, बैलगाडीवर जा, मोदींनी सांगितले आहे. आपण मोदींचे ऐकलेच पाहिजे. ते परदेशी जनता उपाशी, अशी टीका आव्हाड यांनी केली आहे.

पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, तेल कमी वापरा म्हणतात, महाराष्ट्रात सर्वाधिक तेल चंद्रकांत पाटील वापरतात, एवढे तेल लावतात ते. आता मला माहीत नाही की ते उद्यापासून तेल कमी वापरणार की केस कापणार. पण उद्यापासून तेल कमी वापरा. मी कोणाला सल्ला देत नाही. सल्ला मी फक्त मोदींचा ऐकतो म्हणून घोड्यावर बसलो आहे, अशी उपहासात्मक टीका आव्हाड यांनी केली.

पंतप्रधान मोदींनी वर्षभर सोने खरेदी करू नका असे म्हटले आहे, यावर जितेंद्र आव्हाड म्हणाले, सोनं हा एकच धंदा आहे ज्यात अडानी अंबानी नाहीयेत. पुढच्या वर्षाच्या अखेरपर्यंत अडानी अंबानी सोन्याच्या धंद्यात येतील. मागच्या वर्षी एक रुपयाला घेतलेले सोने १ रुपया ५४ पैसे देऊन गेले आहे. तसेच भाजपच्या लोकांच्या ताफ्यातच जास्त गाड्या दिसून येत आहेत. त्यांना सगळे माफ आहे. त्यांनी गाड्या वापरायच्या, परदेशात जायचं, सर्वसामान्य जनतेने मात्र काही करू नये.

पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, देशात जेव्हा कम्प्युटर आले होते, तेव्हा मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी अटल बिहारी वाजपेयी हे स्वतः बैलगाडी घेऊन संसदेत गेले होते.

आमचे आता आवाहन आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जेव्हा वर्षामधून निघतात मंत्रालयात येण्यासाठी, तेव्हा त्यांनी घोडा गाडी किंवा बैलगाडीमधून जावे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

## NEET पेपर लीक, परीक्षा रद्द, CBI चौकशी करणार



**मुंबई :** पेपरफुटीच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय चाचणी संस्थेने (NTA) मंगळवारी नीट (यूजी) २०२६ परीक्षा रद्द केली. ही परीक्षा ३ मे रोजी झाली होती. या परीक्षेला २२.७९ लाख विद्यार्थी बसले होते.

एनटीएचे महासंचालक (डीजी) अभिषेक सिंह म्हणाले, "या चुकीसाठी आम्ही जबाबदार आहोत. परीक्षा पुन्हा घेतली जाईल. नवीन तारीख ६ ते ८ दिवसांत जाहीर केली जाईल."

दरम्यान, केंद्र सरकारने या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला आहे. या संस्थेने या प्रकरणात एफआयआर दाखल केला आहे. एनटीएने म्हटले आहे की, भारत सरकारची परवानगी मिळाल्यानंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, दिल्लीत शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना या प्रकरणी माध्यमांनी प्रश्न विचारले असता, ते काहीही न बोलता निघून गेले.

•1 **मे:** केरळमधील कॉलेजमध्ये एमबीबीएस करणाऱ्या चूरू येथील एका मुलाने ‘प्रश्न बँक’ सीकरमधील त्याच्या मित्राला पाठवली.

•2 **मे:** ही ‘प्रश्न बँक’ सीकरमधील एका पीजी संचालकाला मिळाली. त्याने ती त्याच्याकडे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली. त्यांच्यामार्फत ती इतर विद्यार्थी आणि करिअर समुपदेशकांपर्यंत पोहोचली आणि नंतर विद्यार्थ्यांमध्ये वाटली गेली.

•3 **मे:** परीक्षा झाल्यानंतर सीकरमधील एका पीजी संचालकाने उद्योग नगर पोलीस ठाण्यात आणि एनटीएला अशी तक्रार दिली होती की, एक कथित ‘प्रश्न बँक’ मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना मिळाली आहे.

•6-7 **मे:** उत्तरपत्रिका (आन्सर-की) आणि परीक्षेसंबंधीच्या चर्चा ऑनलाइन समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये आणि कोचिंग सेंटर्समध्ये एका कथित 'गेस पेपर'बद्दल चर्चा सुरू झाली, जो कथितरित्या मूळ परीक्षेसारखाच होता.

•७ **मे:** NTA ने पुष्टी केली की, परीक्षेच्या ४ दिवसांनंतर, म्हणजेच ७ मे रोजी, कथित गैरप्रकारांशी संबंधित माहिती त्यांना मिळाली होती. एजन्सीने सांगितले की, हे प्रकरण राजस्थान आणि उत्तराखंडमधून समोर आले.

•८ **मे:** NTA ने तपास केंद्रीय एजन्सींना सोपवला.

•१० **मे:** राजस्थान पोलीस स्पेशल ऑपरेशन ग्रुप (SOG) ने सांगितले की, त्यांनी नीट पेपर लीक प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. १२ मे पर्यंत सीकर आणि आसपासच्या भागातून १३ लोकांना अटक केली.

‘प्रश्न बँक’मध्ये फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजीचे 300 हून अधिक प्रश्न होते. हे सर्व हाताने लिहिलेले होते आणि त्यांचे हस्ताक्षरही एकच होते. यापैकी 150 प्रश्न नीटच्या पेपरमध्ये जसेच्या तसे आले.

पेपरमध्ये एकूण 180 प्रश्न सोडवायचे असतात आणि प्रत्येक प्रश्न 4 गुणांचा असतो. म्हणजेच, 720 पैकी 600 गुणांचे प्रश्न थेट ‘प्रश्न बँक’मधून आले. तज्ज्ञांच्या मते, एखाद्या विशिष्ट गेस पेपरमधून परीक्षेत काही प्रश्न जसेच्या तसे येण्याची शक्यता असते, परंतु इतक्या मोठ्या संख्येने प्रश्न येण्याची शक्यता सहसा नसते.

**कितक्या विद्यार्थ्यांना मिळाले हे निश्चित नाही** आतापर्यंत कथित ‘प्रश्न बँक’ किती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली, याचा आकडा समोर आलेला नाही, पण ही संख्या मोठी असण्याची शक्यता आहे. खरं तर, ज्यांना हे व्हॉट्सॲपवर मिळाले, त्यात मेसेजसोबत ‘फॉरवर्डेड मेनी टाइम्स’ असे लिहिलेले येत आहे. आता याचे धागेदोरे केरळ, राजस्थान, बिहार, महाराष्ट्रापर्यंत जोडले जात आहेत.

### 2024 मध्येही पेपर लीक झाला होता, प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते

2024 मध्येही NEET UG परीक्षा पेपरफुटीमुळे काही केंद्रांवर रद्द करण्यात आली होती. परीक्षा 5 मे 2024 रोजी झाली होती. 6 मे रोजी NTA ने पेपरफुटीची बाब नाकारली होती. त्यानंतर बिहार (पाटणा) आणि झारखंड (हजारीबाग) येथे चौकशी झाली. चौकशीत पेपरफुटीचे पुरावे मिळाले आणि अनेक अटकसत्रही झाले होते.

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण परीक्षा रद्द करण्यास नकार दिला होता आणि काही केंद्रांवर 1539 उमेदवारांची पुन्हा परीक्षा झाली होती. पेपरफुटीच्या आरोपांव्यतिरिक्त, 67 विद्यार्थ्यांना 720/720 गुण मिळणे आणि एकाच केंद्रातून अनेक टॉपर येणे हे देखील मोठ्या वादाचे कारण ठरले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ मे २०२६


## लक्ष्मण बाबूअप्पा लिंभारे वीरशैव लिंगायत समाजचे भूषण पुरस्काराने सन्मानित



**दौलताबाद (जावेद अहमद) :** मातोश्री समृद्धी प्रतिष्ठान व जे बी शेट संचिलत संस्थेच्या वतीने राजकीय, सामाजिक, महिला सबलीकरण, शैक्षणिक अश्या अनेक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या लोकांना अकरा वर्षापासून पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे रविवारी मौलाना आझाद रिसर्च सेंटर येथे माजी न्यायधीश दर्शनसिंग बेदी व सिटी चौक पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आलेयावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयराम भोईर,मकसूद अन्सारी,सलीम चिस्ती,हाफिज अली,शकील शेख,पत्रकार जावेद शेख,मुख्य संपादक हसन अली,हनिफ शेख आदींची उपस्थिती होतीलक्ष्मण बाबूअप्पा लिंभारे वीरशैव लिंगायत समाज चे भूषण अप्पा वाडी शरणापूर छत्रपती संभाजीनगरछत्रपती संभाजी नगर पश्चिम विभाग लिंगायत समाज अध्यक्ष ,शिवपुरान महात्म्य आयोजन संयोजन सात दिवस सतत सात दिवस महाप्रसाद चे आयोजन समाज जाणीव जागृती अभियान ,साखरखेड्रॉ परमपूज्य ष ब्र 108 सदगूरू सिद्धचेतन्य शिवाचार्य साखरखेड्रॉ यांच्या मठासाठी योगदान अप्पवाडी च्या मदतीने समर्पण स्वतःच्या पायावर शून्यातून उभे राहून गोरगरीबलोकांना नेहमीच मदतीला धावून जाणे सुख दु:खात नेहमीच मदत करणे.




## भानुदास दगडू धनाईत यांच्या कार्याचा पुरस्काराने गौरव




**दौलताबाद (जावेद अहमद) :** मातोश्री समृद्धी प्रतिष्ठान व जे बी शेट संचिलत संस्थेच्या वतीने राजकीय, सामाजिक, महिला सबलीकरण, शैक्षणिक अश्या अनेक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या लोकांना अकरा वर्षापासून पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे रविवारी मौलाना आझाद रिसर्च सेंटर येथे माजी न्यायधीश दर्शनसिंग बेदी व सिटी चौक पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आलेयावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयराम भोईर,मकसूद अन्सारी,सलीम चिस्ती,हाफिज अली,शकील शेख,पत्रकार जावेद शेख,मुख्य संपादक हसन अली,हनिफ शेख आदींची उपस्थिती होतीभानुदास दगडू धनाईत अब्दीमंडी (दौलताबाद) छत्रपती संभाजी नगर माजी सैनिक मराठा लाईट इंफ्टरी २० वर्ष देशसेवा १९९१ ला सैन्य दलात भरती होऊन २०११ ला सेवानिवृत्त झाले आहेदेशातील कर्नाटक, जमू काश्मीर, गुजरात, राजस्थान, मणिपूर येथे कर्तव्य पार पाडले आहेसेवानिवृत्ती नंतर सामाजिक व धार्मिक कार्याची आवड असल्याने अब्दीमंडी गावातील होणारे सण निमित्ताने रावण दहन ती प्रथा बंद करून गावातील ग्रामस्थांच्या मदतीने गावात होणारे रावण दहन बंद करून गावा बाहेर दहन करण्याची सुरवात केलीअब्दीमंडी गावात सप्ताह चे ग्रामस्थांच्या मदतीने सुरुवात करून ह भ प रामगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे भव्य काल्याचे कीर्तन करून नवीन सुरुवात केलीपंचक्रोशीतील सर्व लोकांना जमा करून गुढीपाडवा निमित्ताने शिव पार्वती काठीची यात्रा १०८ सोमेश्वर नंद गिरी महाराज ( शिव टेकडी) यांच्या कृपा आशीर्वादाने व त्यांच्या मार्गदर्शनाखाली अब्दीमंडी येथे यात्रेची सुरवात करण्यात आलीमातोश्री समृद्धी प्रतिष्ठान व जे बी शेट संचिलत संस्थेच्या वतीने राजकीय, सामाजिक, महिला सबलीकरण, शैक्षणिक अश्या अनेक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या लोकांना अकरा वर्षापासून पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे रविवारी मौलाना आझाद रिसर्च सेंटर येथे माजी न्यायधीश दर्शनसिंग बेदी व सिटी चौक पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आलेयावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयराम भोईर,मकसूद अन्सारी,सलीम चिस्ती,हाफिज अली,शकील शेख,पत्रकार जावेद शेख,मुख्य संपादक हसन अली,हनिफ शेख आदींची उपस्थिती होतीभानुदास दगडू धनाईत अब्दीमंडी (दौलताबाद) छत्रपती संभाजी नगर माजी सैनिक मराठा लाईट इंफ्टरी २० वर्ष देशसेवा १९९१ ला सैन्य दलात भरती होऊन २०११ ला सेवानिवृत्त झाले आहेदेशातील कर्नाटक, जमू काश्मीर, गुजरात, राजस्थान, मणिपूर येथे कर्तव्य पार पाडले आहेसेवानिवृत्ती नंतर सामाजिक व धार्मिक कार्याची आवड असल्याने अब्दीमंडी गावातील होणारे सण निमित्ताने रावण दहन ती प्रथा बंद करून गावातील ग्रामस्थांच्या मदतीने गावात होणारे रावण दहन बंद करून गावा बाहेर दहन करण्याची सुरवात केली.

अब्दीमंडी गावात सप्ताह चे ग्रामस्थांच्या मदतीने सुरुवात करून ह भ प रामगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे भव्य काल्याचे कीर्तन करून नवीन सुरुवात केलीपंचक्रोशीतील सर्व लोकांना जमा करून गुढीपाडवा निमित्ताने शिव पार्वती काठीची यात्रा १०८ सोमेश्वर नंद गिरी महाराज ( शिव टेकडी) यांच्या कृपा आशीर्वादाने व त्यांच्या मार्गदर्शनाखाली अब्दीमंडी येथे यात्रेची सुरवात करण्यात आली.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ मे २०२६

# शरणापूरच्या सरपंच संध्या संदीप सदावर्ते यांना उत्कृष्ट महिला सरपंच पुरस्कार




**दौलताबाद (जावेद अहमद) :** मातोश्री समृद्धी प्रतिष्ठान व जे बी शेट संचिलत संस्थेच्या वतीने राजकीय, सामाजिक, महिला सबलीकरण, शैक्षणिक अश्या अनेक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या लोकांना अकरा वर्षापासून पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे रविवारी मौलाना आझाद रिसर्च सेंटर येथे माजी न्यायधीश दर्शनसिंग बेदी व सिटी चौक पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आलेयावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयराम भोईर,मकसूद अन्सारी,सलीम चिस्ती,हाफिज अली,शकील शेख,पत्रकार जावेद शेख,मुख्य संपादक हसन अली,हनिफ शेख आदींची उपस्थिती होतीउदयोन्मुख व उत्कृष्ट महिला सरपंच २०२२ डिसेंबर पासून शरणापूर येथील सरपंच पदावर कार्यरत आहेकार्यकाळात गावातील केलेली विकास कामेदलित वस्ती सुधार आणि दलित समशान भूमीचे सुशोभीकरण, लिंगायत समाज समशान भूमीचे सुशोभीकरण,सार्वजनिक समशान भूमीचे सुशोभीकरण, शरणापूर ते धरमपूर येथील डांबर व सिमेंट रस्त्याचे काम, गावातील मुख्य रस्त्यावर प्रवेशद्वार उभारले, जिल्हा परिषद शाळेसाठी दोन वर्ग खोल्या, सोलर लाईट, रंगमंच व वारे वस्तीवर ड्रेनेज चे काम केले आहेया पुरस्कारा बदल त्यांचे त्याचे कौतुक करण्यात आले.

# अल्पसंख्याक शाळांतील शिक्षकांना 'टीईटी'तून सूट




**छत्रपती संभाजीनगर :** अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांद्वारे चालवल्या जाणाऱ्या शाळांमधील शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण असण्याची अट अनिवार्य नसल्याचा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. या निकालामुळे राज्यभरातील अल्पसंख्याक संस्थांमधील शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला असून, शिक्षण अधिकाऱ्यांनी 'टीईटी' पात्रतेअभावी नाकारलेले शालार्थ आयडी आणि पदमान्यतेचे प्रस्ताव आता पुन्हा विचाराधीन घेण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत.

सय्यद अबू झैद सय्यद रफिक, सायली गायकवाड आणि साईनाथ बनसोडे या शिक्षकांची 'शिक्षण सेवक' म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, हे शिक्षक 'टीईटी' उत्तीर्ण नसल्याचे तांत्रिक कारण पुढे करत शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीला मान्यता नाकारली होती. या अन्यायाविरोधात संबंधित शिक्षकांनी खंडपीठात धाव घेतली होती. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. सय्यद तौसिफ यासीन, ॲड. शेख तारेक मोबिन आणि ॲड. के. पी. रोडगे यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती अजित बी. काडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने खालील महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित केले.

•**सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश:** 'अंजुमन इशहात-ए-तालीम ट्रस्ट विरुद्ध महाराष्ट्र शासन' या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अल्पसंख्याक शाळांमधील टीईटी अनिवार्यतेचा मुद्दा मोठ्या खंडपीठाकडे (Larger Bench) सोपवला आहे. जोपर्यंत यावर अंतिम निर्णय लागत नाही, तोपर्यंत शिक्षण अधिकारी टीईटी पात्रतेचा आग्रह धरून प्रस्ताव नाकारू शकत नाहीत.

•**शासनाचे परिपत्रक:** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी स्पष्ट केले होते की, अल्पसंख्याक संस्थांना शिक्षण हक्क कायदा (RTE) लागू नसल्यामुळे शिक्षकांना टीईटी सक्तीची नाही.

**शिक्षण अधिकाऱ्यांना कडक इशारा**

वारंवार आदेश देऊनही शिक्षण अधिकारी सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयांकडे दुर्लक्ष करत असल्याबद्दल खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली. "शिक्षण अधिकारी न्यायालयात हजर राहून बिनशर्त माफी मागतात, पण पुन्हा तेच चुका करतात. यावेळी आम्ही त्यांना दंड न आकारता केवळ इशारा देऊन सोडत आहोत, परंतु भविष्यात अशा चुका झाल्यास कठोर कारवाई केली जाईल," असे खंडपीठाने स्पष्ट केले.

**1.आदेश रद्द:** शिक्षण अधिकाऱ्यांनी १६ एप्रिल २०२६, ७ एप्रिल २०२६ आणि २५ मार्च २०२५ रोजी दिलेले फेटाळणीचे आदेश न्यायालयाने रद्द केले आहेत.

**2.प्रस्ताव पुन्हा सादर करा:** संबंधित शैक्षणिक संस्थांनी १५ दिवसांच्या आत शिक्षकांचे प्रस्ताव पुन्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडे सादर करावेत.

**3.मुदतीत निर्णय:** शिक्षण अधिकाऱ्यांनी टीईटी पात्रतेचा आग्रह न धरता, या प्रस्तावांवर एक महिन्याच्या आत कायदेशीर निर्णय घ्यावा, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

## कामाच्या शोधात

तांडा चालला चालला
बघा कामाच्या शोधात
सारे गबाळ बांधून
ऊस तोडणी कामात....१

नाही भरोसा कामाचा
कुठे मिळणार काम
कसे जगावे जीवन
हाती नसतांना दाम....२

आहे हातावर पोट
कसे पोसावे मुलांना
रोज राहून उपाशी
ताजे ठेवावे फुलांना....३

हाल पाहून मुलांचे
जीव तीळ तीळ तुटे
रोज भाकर शोधता
गाव मागे मागे सुटे....४

नाही लागणार जीव
दूर जाता माझे गाव
काय करू जगतांना
गाव दूर जातो राव....५

सांगा सांगा दादा भाऊ
मूल बाळ कुठे नेऊ
भूक लागता मुलांना
खाऊ त्यांना काय देऊ. ६

दु:ख सांगावे कोणास
कुठे तक्रार करावे
कोण देणार आधार
काय असेच मरावे .....७

अशी कशी लोकशाही
कोणी नाही इथे वाली
नाव नोंदून घेईना
गाव रकाना रे खाली...८



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ मे २०२६


# छत्रपती संभाजी महाराज : पराक्रमाचे तेजस्वी प्रतीक



**म**राठ्यांच्या इतिहासात शौर्य, पराक्रम, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची असंख्य तेजस्वी उदाहरणे आढळतात. या परंपरेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारतीय इतिहासात अभूतपूर्व कार्य केले. मात्र या स्वराज्याचे रक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती देणारे, संकटांना न डगमगता सामोरे जाणारे आणि मृत्यूला देखील हसत स्वीकारणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होय. १४ मे हा दिवस छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका राजाचा जन्मदिन नसून स्वाभिमान, विद्वत्ता आणि अपराजित धैर्य यांच्या स्मरणाचा दिवस आहे.छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. त्यांचे बालपण हे अत्यंत संघर्षमय आणि आव्हानात्मक परिस्थितीत गेले. त्यांचे वडील छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य उभारणीच्या कार्यात सतत व्यस्त होते, तर माता सईबाईंचे निधन संभाजी महाराज लहान असतानाच झाले. त्यामुळे त्यांचे संगोपन जिजाऊ मातांच्या संस्कारांत झाले. जिजाऊंच्या सान्निध्यात त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम, शौर्य आणि न्यायप्रियता यांचे संस्कार रुजले. बालपणापासूनच संभाजी महाराज अत्यंत बुद्धिमान, पराक्रमी आणि अभ्यासू होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. संस्कृत, फारसी, मराठी, हिंदी आणि पोर्तुगीज भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी अल्पवयातच ‘बुधभूषण’ हा संस्कृत ग्रंथ लिहिला. यावरून त्यांच्या विद्वत्तेची कल्पना येते.संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ योद्ध्याचे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक, अभ्यासू साहित्यिक आणि दूरदृष्टी असलेले राजकारणी होते. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे संघर्ष आणि कटकारस्थानांनी भरलेले होते. आग्रा येथे औरंगजेबाच्या कैदेतून सुटका करताना त्यांनी दाखवलेले धैर्य उल्लेखनीय होते. शिवाजी महाराजांसोबत त्यांनी संकटांना सामोरे जात स्वराज्याचे धडे घेतले. बालवयातच त्यांनी युद्धकला, राजकारण आणि प्रशासन यांचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुढे राज्यकारभार सांभाळताना त्यांना अनेक अनुभवांचा उपयोग झाला.छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर मोठे संकट आले. अंतर्गत राजकीय मतभेद आणि बाह्य शत्रूंचे आक्रमण अशा कठीण परिस्थितीत संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली. १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला आणि त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यांच्या कारकिर्दीचा काळ हा अत्यंत संघर्षमय होता. मुघल सम्राट औरंगजेबाने दक्षिणेत उतरून मराठ्यांचे राज्य संपविण्याचा निर्धार केला होता. त्याच वेळी सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्याशीही संघर्ष सुरू होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी धैर्याने आणि चातुर्याने शत्रूंना तोंड दिले.संभाजी महाराज हे अत्यंत पराक्रमी सेनानी होते. त्यांनी अनेक युद्धांमध्ये आपल्या नेतृत्वाचे दर्शन घडवले. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने मुघलांना वारंवार पराभूत केले. औरंगजेबासारख्या बलाढ्य सम्राटालाही संभाजी महाराजांचे सामर्थ्य जाणवले होते. त्यांनी आपल्या सैन्याला प्रेरणा देत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांच्या युद्धनीतीमध्ये वेग, गनिमी कावा आणि अचूक नियोजन यांना विशेष महत्त्व होते. मराठा सैन्याची ताकद वाढविण्यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या.१६८९ मध्ये संगमेश्वर येथे आपल्यातीलच काहींच्या फितुरीमुळे संभाजी महाराज आणि कवी कलश मुघलांच्या ताब्यात गेले. औरंगजेबाने त्यांना अमानुष छळ दिला. त्यांच्या डोळ्यांसमोर अत्याचार करण्यात आले, शरीराचे हाल करण्यात आले, तरीही त्यांनी स्वाभिमान सोडला नाही. अखेर ११ मार्च १६८९ रोजी त्यांची क्रूर हत्या करण्यात आली. मात्र त्यांच्या बलिदानामुळे मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि स्वराज्य अधिक बळकट झाले.छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे महत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यांनी दिलेला संदेश संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. संकटे कितीही मोठी असली तरी स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा यांचा त्याग करू नये, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्यांचे बलिदान हे भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे.संभाजी महाराज अत्यंत विद्वान, संवेदनशील आणि कुशल शासक होते. त्यांनी राज्यकारभारात शिस्त, न्याय आणि प्रजेच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी शेतकरी, सैनिक आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले.संभाजी महाराजांच्या विद्वत्तेचा विचार केला तर ते त्या काळातील अत्यंत अभ्यासू राजांपैकी एक होते. त्यांनी संस्कृत साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. ‘बुधभूषण’ या ग्रंथामध्ये त्यांनी राजकारण, नीतिशास्त्र आणि प्रशासन यांवर विचार मांडले आहेत. युद्धाच्या धामधुमीतही साहित्य आणि ज्ञान यांच्याशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यापक आणि प्रेरणादायी ठरते.संभाजी महाराजांनी मराठा साम्राज्य टिकवून ठेवण्यात मोलाची भूमिका बजावली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे हे अत्यंत कठीण काम होते. कारण मुघल साम्राज्य त्या काळी अत्यंत बलाढ्य होते. औरंगजेब स्वतः दक्षिणेत उतरला होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी जवळपास नऊ वर्षे संघर्ष करत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांनी कधीही शत्रूपुढे शरणागती पत्करली नाही. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी औरंगजेबाला प्रखर प्रतिकार केला. संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि इतर मराठा सरदारांनी मुघल सैन्याला हैराण केले. अखेरीस औरंगजेबाचा दक्षिणेतील मोहिमेमध्ये पराभव झाला. यामागे संभाजी महाराजांनी निर्माण केलेली प्रेरणा आणि स्वराज्यनिष्ठा कारणीभूत होती.छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. आजच्या काळात स्वार्थ, भौतिकता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास दिसून येतो. अशा वेळी संभाजी महाराजांचे जीवन आपल्याला राष्ट्रप्रेम, धैर्य, संघर्षशीलता आणि नीतिमूल्यांची जाणीव करून देते. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांचा सामना केला. त्यांनी परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.आज महाराष्ट्रात आणि देशभरात संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. व्याख्याने, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतिहास अभ्यास शिबिरे यांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाते. अनेक युवक संघटना आणि सामाजिक संस्था त्यांच्या विचारांचा प्रचार करतात. मात्र केवळ जयंती साजरी करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचे आणि आदर्शांचे पालन करणे अधिक महत्त्वाचे आहे.संभाजी महाराजांचा इतिहास हा केवळ युद्धांचा इतिहास नाही, तर तो संस्कृती रक्षणाचा इतिहास आहे. त्यांनी हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांचे लोक होते. त्यांनी कधीही जातीय किंवा धार्मिक द्वेषाला प्रोत्साहन दिले नाही. न्याय, समानता आणि स्वराज्य हीच त्यांची भूमिका होती.त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची कणखर निर्णयक्षमता. कठीण प्रसंगांमध्ये त्यांनी धैर्याने निर्णय घेतले. युद्धभूमीवर ते स्वतः सैनिकांसोबत लढत असत. त्यामुळे सैनिकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदर होता. राजा असूनही त्यांनी कधीही ऐषआरामाला प्राधान्य दिले नाही. त्यांचे जीवन संघर्ष आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक होते.संभाजी महाराजांच्या काळात मराठा आरमारालाही महत्त्व होते. सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याविरुद्ध त्यांनी समुद्री संरक्षण मजबूत करण्याचा प्रयत्न केला. किनारपट्टीवरील किल्ले आणि व्यापार यांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी उपाययोजना केल्या. यावरून त्यांच्या प्रशासनातील दूरदृष्टी स्पष्ट होते.संभाजी महाराजांचे जीवन हे त्यागाचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी स्वतःच्या सुखाचा कधी विचार केला नाही. स्वराज्य आणि धर्मरक्षण हेच त्यांचे ध्येय होते. मृत्यू समोर असतानाही त्यांनी आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यामुळे ते भारतीय इतिहासातील अमर वीर ठरतात.आजच्या काळात इतिहासाचे योग्य आकलन होणे अत्यंत आवश्यक आहे. इतिहास केवळ गौरवासाठी नसतो, तर तो वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी मार्गदर्शक असतो. संभाजी महाराजांचा इतिहास आपल्याला संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देतो. त्यांनी संकटांना संधीमध्ये बदलले आणि स्वराज्य टिकवून ठेवले.संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनातील मूल्यांचा विचार करणे गरजेचे आहे. राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा, विद्वत्ता आणि धैर्य ही मूल्ये समाजात रुजली तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आजच्या युवकांनी त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करून त्यातून प्रेरणा घ्यावी. मोबाईल आणि सामाजिक माध्यमांच्या आहारी जाण्याऐवजी इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे.छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे बलिदान भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी राष्ट्रहित, सामाजिक एकता आणि नैतिक मूल्ये जपण्याचा संकल्प केला पाहिजे.मराठ्यांच्या इतिहासातील तेजस्वी पर्व म्हणून संभाजी महाराजांचे नाव सदैव स्मरणात राहील. त्यांचे जीवन संघर्षाचे, शौर्याचे आणि अटळ निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवून दिले की कोणतेही संकट मनुष्याच्या आत्मबलापुढे मोठे नसते. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, सत्यासाठी लढणे आणि राष्ट्रासाठी बलिदान देणे हेच खरे जीवनमूल्य आहे.आजही महाराष्ट्रातील गड-किल्ले संभाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देत उभे आहेत. प्रत्येक किल्ला त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगतो. त्यांच्या स्मृती आजही जनमानसात जिवंत आहेत. गावागावांतून त्यांच्या जयंतीनिमित्त उत्साह दिसून येतो. युवकांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आकर्षण आणि आदर आहे.संभाजी महाराजांचे विचार समाजाला एकत्र आणणारे आहेत. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष केला, पण कधीही मानवतेचा त्याग केला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शौर्याबरोबरच संवेदनशीलताही होती. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यामुळे ते लोकाभिमुख राजा म्हणूनही ओळखले जातात.छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी त्यांच्या जीवनावर आधारित अभ्यास, व्याख्याने आणि उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. इतिहासाचे योग्य ज्ञान मिळाल्यास युवकांमध्ये राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होईल.छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे एका जाज्वल्य राष्ट्रभक्ताचे जीवन होते. त्यांनी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता स्वराज्याचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे मराठा साम्राज्य अधिक मजबूत झाले आणि पुढे पेशव्यांच्या काळात मराठ्यांनी दिल्लीपर्यंत झेंडा फडकवला. त्यामुळे संभाजी महाराजांचे योगदान मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. भ्रष्टाचार, अन्याय, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. स्वाभिमानी, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.छत्रपती संभाजी महाराज हे भारतीय इतिहासातील अजरामर व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शौर्य, विद्वत्ता आणि बलिदान यामुळे ते सदैव जनमानसात जिवंत राहतील. १४ मे रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा निर्धार केला पाहिजे. राष्ट्र आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली जिद्द, धैर्य आणि निष्ठा यांचे तेजस्वी उदाहरण म्हणून छत्रपती संभाजी महाराजांचे नाव भारतीय इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com


# कु. जयश्री देविदास पाटील मराठी विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवून राज्यात प्रथम



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** मराठी भाषेच्या प्रांगणात यशाचा सुवर्णप्रकाश: कु. जयश्री देविदास पाटील हिचा देदीप्यमान गुणगौरव व सत्कार ,दिनांक 14 मे 2026 रोजी सकाळी 11 वाजता केला जाणार आहे. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपली संस्कृती आणि अस्मितेचा आरसा व वारसा आहे. याच भाषेच्या अथांग ज्ञानसागरातून यशाची अनमोल रत्ने वेचण्याचे अतुलनीय कार्य कु. जयश्री देविदास पाटील. हिने केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेत मराठी विषयात 100 पैकी 99 गुण प्राप्त करून महाराष्ट्र राज्यातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवणे, ही बाब खरोखरच मराठवाड्याच्या शैक्षणिक आणि साहित्यिक शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आहे. "शब्दांच्या लेण्यांनी सजली यशाची ही मूर्ती, मराठीच्या गुलालानं दशदिशात पसरली तुझी कीर्ती!" असे गौरव उद्गार मराठी विषय महासंघाचे राज्य समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी याप्रसंगी व्यक्त गेलेत. कु. जयश्री पाटील हिच्या यशाबद्दल कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रा. सुनील डिसले ( बारामती) व व केंद्रीय कार्य करण्याच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी कु. जयश्री चे अभिनंदन व कौतुक केले आहे. दिनांक 14 मे 2026 रोजी सकाळी 11 वाजता त्यांच्या राहत्या घरी, मु.पो.~ वरुड बु. तालुका~ भोकरदन, जिल्हा~ जालना येथे तिचा राज्य कार्यकारिणी व जालना जिल्हा मराठी विषय महासंघाच्या वतीने यथोचित असा सत्कार करण्यात येणार असल्याचे प्रा. प्रवीण भुतेकर यांनी सांगितले. विद्यार्थिनीचा सत्कार नसून मराठी भाषेच्या गुणवत्तेचा केलेला सन्मान आहे. यशाचा पाया रचला गेला, करण्यात आला. गुरु-शिष्यांच्या या जोडीने मिळवले हे यश समस्त शिक्षक वृंद आणि मराठी प्रेमींसाठी प्रेरणादायी ठरेल.

जालना जिल्ह्यात आतापर्यंत मराठी विषयात राज्यात प्रथम आलेली कु. जयश्री देविदास पाटील असल्याने डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालय शिक्षक संघटनेतर्फे तिचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत प्रा. जगदीश मुळे यांनी सांगितले आहे.


